मराठी

# बालभारती

इयत्ता पहिली



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.


(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ०८.०५.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी
# बालभारती
## इयत्ता पहिली



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

5C3QQS

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, तसेच पाठ्यपुस्तकातील आशयाच्या अनुषंगाने दिलेल्या अन्य Q. R. Code द्वारे अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८

तिसरे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा निमंत्रित अभ्यासगट सदस्य**

| | |
|---|---|
| श्रीमती रेणू दांडेकर | श्री. हरी नारलावार |
| श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी | श्रीमती आशा तेरवाडिया |
| श्रीमती सीमा महाडिक | श्रीमती राधिका पवार |
| श्रीमती शर्मिला ठाकरे | श्री. मंगेश दसोडे |
| श्री. सुरेश कारंडे | श्री. धोंडीबा गायकवाड |
| श्रीमती उमा लोणारकर | श्रीमती सुनिता पाटील |
| श्री. बाळासाहेब लिम्बीकाई | श्रीमती कांचन जोशी |
| श्री. राजेश्वर पवार | श्रीमती प्रतिभा लोखंडे |
| श्री. संदीप वाकचौरे | श्रीमती पूजा जाधव |

**निर्मिती**

**सच्चिदानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**सचिन मेहता**
निर्मिती अधिकारी
**नितीन वाणी**
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

| | | |
|---|---|---|
| संयोजन | : | **श्रीमती सविता अनिल वायळ**<br>विशेषाधिकारी, मराठी |
| चित्रकार | : | स्वराली ताविलदार, गौरव गोगावले, फारुख नदाफ |
| मुखपृष्ठ | : | फारुख नदाफ |
| अक्षरजुळणी | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| कागद | : | ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह |
| मुद्रणादेश | : | N/PB/2021-22/55,000 |
| मुद्रक | : | M/S. PRINTOGRAPHY SYSTEMS (INDIA) PVT. LTD., MUMBAI |

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो!

तुम्ही पहिलीत आलात. तुमचे मनापासून स्वागत. इयत्ता पहिलीचे मराठी बालभारती हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना आनंद होत आहे.

इयत्ता पहिली म्हणजे शिक्षणाची सुरुवात, शिक्षणाचा पाया. हा पाया पक्का होण्यासाठी तुम्हांला आपली मराठी भाषा चांगली बोलता, वाचता आणि लिहिता यायला हवी. आत्तापर्यंत तुम्ही घरी आणि घराबाहेर मराठी भाषा ऐकलीत. मराठीत बोललात. आता तुम्हांला वाचायला आणि लिहायला शिकायचे आहे. तुमचे शिकणे रंजकतेने, आनंददायी पद्धतीने आणि सहजतेने व्हावे, यासाठी या पाठ्यपुस्तकाची रचना चित्रमय आणि कृतींवर आधारित अशी करण्यात आली आहे.

या पाठ्यपुस्तकात गाणी आहेत. ती सगळ्यांनी मिळून म्हणताना तुम्हांला खूप मजा येईल. तसेच इथे गोष्टीसुद्धा आहेत. गोष्टी ऐकताना, सांगताना मोठी धमाल वाटेल. चित्रांवरून गोष्टी तयार करून त्या मित्रमैत्रिणींना सांगताना तुम्ही अगदी रमून जाल. चित्रे पाहून गप्पा मारताना, तुमचे अनुभव ऐकताना सर्वांना खूप गंमत वाटेल.

भाषेतील शब्द, अक्षरे शिकण्यासाठी तुम्हांला आवडणारी खूप रंगीत चित्रे दिलेली आहेत. चित्रांवरून शब्द आणि अक्षरे शिकताना तुम्हांला नक्कीच गंमत वाटेल. ऐकायचे, पाहायचे आणि म्हणत म्हणत वाचायला शिकायचे, गिरवत गिरवत लिहायला शिकायचे, सरावातून ते पक्के करायचे, सारे काही अगदी मजेत. इथे शब्दांचे काही खेळसुद्धा दिले आहेत. ते खेळत खेळत भाषा शिकायची आहे. शब्द, वाक्ये वाचता वाचता पाठ वाचायचे आणि हसतखेळत नवीन पाठ तयार करायचे. या सगळ्यांमधून स्वत:चे स्वत: शिकण्यातील मौज तुम्ही अनुभवाल! या पाठ्यपुस्तकातील गाणी, गोष्टी, चित्रवाचन, अक्षरगट, वाचनपाठ आणि इतर कृती यांसाठी क्यू. आर. कोड दिले आहेत. त्याद्वारे मिळणारी माहितीसुद्धा तुम्हांला नक्कीच आवडेल.

पहिलीचे वर्ष संपता संपता तुम्ही छान बोलायला शिकाल. चांगले वाचायला आणि सुंदर लिहायलाही शिकाल! मित्रमैत्रिणींनो आनंदाने शिकत शिकत खूप मोठे व्हा!! यासाठी तुम्हांला खूप खूप शुभेच्छा!!!

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १६ मे २०१८
भारतीय सौर : २६ वैशाख १९४०

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी पहिली

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
| --- | --- |
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>• आपल्या भाषेत बोलण्याचे, चर्चा करण्याचे भरपूर स्वातंत्र्य आणि संधी दिली जावी.<br>• आपली गोष्ट सांगण्यासाठी (भाषिक आणि सांकेतिक स्वरूपात) संधी व प्रोत्साहन द्यावे.<br>• मुलांद्वारे त्यांच्या भाषेत बोलल्या जाणाऱ्या गोष्टी मराठी भाषा आणि इतर भाषांमध्ये (जी भाषा वर्गात वापरली जाते किंवा ज्या भाषांमध्ये मुले वर्गात बोलतात.) पुन्हा मांडण्याची संधी द्यावी. त्यामुळे त्या भाषांना वर्गात योग्य स्थान मिळू शकते आणि मुलांच्या शब्दसंपत्ती, अभिव्यक्तीच्या विकासास संधी मिळू शकेल.<br>• कथा, कविता सांगून ऐकण्याच्या व त्यावर गप्पा मारण्यासाठी संधी दिल्या जाव्यात.<br>• मराठीमध्ये सांगितलेली गोष्ट, कविता, गीत, कथा इत्यादी आपापल्या पद्धतीने आणि आपापल्या भाषेत सांगण्याची संधी दिली जावी.<br>• प्रश्न विचारण्याची आणि आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जावी.<br>• वर्ग किंवा शाळेत (वाचनकट्टा/ग्रंथालय) स्तरांनुसार वेगवेगळ्या भाषांची (मुलांची स्वत:ची भाषा/इतर भाषेतील) मनोरंजक साहित्य जसे– बालसाहित्य, बालपत्रिका, फलक, दृक्श्राव्य साहित्य उपलब्ध करून द्यावे. हे साहित्य ब्रेल लिपीतही उपलब्ध असावे. दृष्टिदोष असणाऱ्या मुलांकरिता काही साहित्य मोठ्या अक्षरांमध्ये छापलेले असावे.<br>• वेगवेगळ्या कथा, कवितांचे चित्रांच्या आधारे अंदाज लावून वाचन करण्याच्या संधी दिल्या जाव्यात.<br>• विविध उद्देशांना लक्षात घेऊन अध्ययनाच्या विविध आयामांना इयत्तांमध्ये योग्य स्थान देण्याची संधी असावी. जसे– एखाद्या गोष्टीमध्ये एखादी माहिती शोधणे, गोष्टीत घडलेल्या विविध घटनांचा योग्य क्रम लावणे, त्यांना आपल्या अनुभवांशी जोडून पाहणे इत्यादी.<br>• ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टी आपल्या पद्धतीने कागदावर उतरवण्याची संधी असावी.<br>• जरी अक्षरांमध्ये वळणदारपणा नसला तरीही मुले अक्षराची आकृती काढण्याची सुरुवात करत असतात. याचा वर्गात स्वीकार केला जावा.<br>• मुलांचे स्वलिपीत केलेले लेखन हा भाषा अध्ययन प्रक्रियेचा भाग समजला जावा. | इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसंदर्भात अपेक्षित अध्ययन निष्पत्ती–<br>01.01.01 विविध उद्देशांसाठी स्वत:च्या भाषेचा किंवा शाळेतील माध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. उदा., कविता, गोष्टी ऐकवणे, माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्वत:चे अनुभव सांगणे.<br>01.01.02 ऐकलेल्या गोष्टींविषयी (गोष्ट, कविता इत्यादी) गप्पा मारतात, आपले मत व्यक्त करतात, प्रश्न विचारतात.<br>01.01.03 भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात. उदा., भिंगरी, झिंगरी.<br>01.01.04 लिखित साहित्य आणि चित्र स्वरूपातील साहित्य यांतील फरक सांगू शकतात.<br>01.01.05 चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.<br>01.01.06 चित्रातील वा चित्रमालिकांतील घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना, कृती आणि पात्र यांना एकसंधपणे पाहून त्यांचे कौतुक करतात.<br>01.01.07 वाचलेल्या गोष्टी, कविता यांतील अक्षरे/शब्द/वाक्ये इत्यादी पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून, समजून ओळखतात.<br>01.01.08 परिसरातील छापील मजकूर व त्याचा उद्देश यांचा संदर्भाने अंदाज लावतात. उदा., वेष्टणावर लिहिलेले ओळखून गोळी/चॉकलेटचे नाव सांगणे.<br>01.01.09 लिखित साहित्यातील अक्षरे, शब्द आणि वाक्ये ही एकके ओळखतात. उदा., 'माझे नाव विमल आहे.' हे कोठे लिहिले आहे ते दाखव/यात 'नाव' हा शब्द कोठे आहे./'नाव' या शब्दातील 'व' वर बोट ठेव.<br>01.01.10 परिचित/अपरिचित मजकुरामध्ये (उदा., मध्यान्ह भोजनाचा तक्ता, स्वत:चे नाव, इयत्ता, आवडत्या पुस्तकाचे नाव) रस घेतात, गप्पागोष्टी करतात आणि त्यांचे अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. उदा., केवळ चित्र किंवा चित्र व मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, पूर्वानुभव आणि माहितीच्या आधारे अंदाज करणे.<br>01.01.11 वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात.<br>01.01.12 शाळेबाहेर आणि शाळेत (वाचनकोपरा/वाचनालय) आपल्या आवडीच्या पुस्तकांची स्वत: निवड करतात आणि वाचण्याचा प्रयत्न करतात.<br>01.01.13 लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या–तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं–पद्धतीने लेखन आणि स्व–नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.<br>01.01.14 स्वत: काढलेल्या चित्रांची नावे लिहितात. उदा., केरसुणीचे चित्र काढून त्याचे 'लोटणं' असे स्वभाषेतील नाव लिहिणे. |

# पाठ्यपुस्तक समजून घेताना

● **प्रास्ताविक :**

शिकणे ही प्रक्रिया खरं म्हणजे जन्मापासूनच सुरू होते. घर, कुटुंब यांच्यातील आंतरक्रियांमधून मूल शिकण्याचा प्रयत्न करते. श्रवण व अनुकरण यांद्वारे मूल शिकतच असते; पण हे शिक्षण अनौपचारिक असते. इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेण्यापूर्वीच मुलांचे मन कळत नकळत घर, कुटुंब, परिसर यांच्याशी जोडले जात असते. तेथील अनुभव, निरीक्षण, श्रवण यांमुळे मूल हळूहळू व्यक्त होण्याचे तंत्र अवगत करते. भाषाशिक्षणात मुलांच्या या पूर्वज्ञानाची मदत घेणे आवश्यक ठरते. चित्र, स्वर, ध्वनी हे मुलांकडे अमूर्त स्वरूपात असतात, ते मूर्त स्वरूपात आणण्यासाठीची प्रक्रिया 'शिकणे' या व्याख्येत बसवता येईल.

औपचारिक भाषा शिक्षणाची सुरुवात 'अक्षरओळख' यापासून करताना ती प्रत्यक्ष शब्दांपासूनच करणे हितावह ठरते. शाळेत येण्यापूर्वीच मुलाने भाषा बोललेली-ऐकलेली असल्यामुळे शब्द व त्यांचे अर्थ त्याच्या परिचयाचे असतात, म्हणून त्या शब्दांचे सहज आकलन होते. परिसरातील शब्द हे परिचयाचे असल्यामुळे लेखन-वाचन शिकण्याच्या सुरुवातीच्या काळात ते वापरले तर त्यांचे ज्ञान हे मुलांच्या पूर्वज्ञानाशी जोडले जाते व आकलनाची प्रक्रिया सुलभ होते. या मूलभूत तत्त्वाचा आधार घेऊन इयत्ता पहिलीच्या या पाठ्यपुस्तकाची मांडणी केली आहे. मुलांच्याजवळ किती व कोणत्या शब्दांचा साठा आहे, याचे सर्वेक्षण करून कोणकोणती अक्षरे मुलांच्या सतत कानांवर पडतात? कोणती अक्षरे अधिक वापरली जातात? यावरून अक्षरगट तयार करण्यात आले आहेत.

सोप्याकडून कठीणाकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे या महत्त्वपूर्ण सूत्रांस अनुसरून या पाठ्यपुस्तकाची रचना केली आहे. अत्यंत आकर्षक व भरपूर चित्रे, बडबड गीतांचा आनंददायी बाज, ताल असलेली अर्थपूर्ण गाणी-अभिनय गीते, अक्षरओळख, छोटे छोटे वाचनपाठ, चित्रकथा, चित्रवाचन, सहेतूक चित्रमालिका, पूर्णविराम व प्रश्नचिन्ह यांची ओळख या सर्वांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. हे पाठ्यपुस्तक नक्कीच विद्यार्थ्यांना आवडणारे व त्यांचे भावविश्व समृद्ध करणारे ठरेल.

● **पाठ्यपुस्तकाची मांडणी :**

इयत्ता पहिलीसाठी पाठ्यपुस्तक तयार करताना अपेक्षित क्षमता व त्या अनुषंगाने येणाऱ्या अध्ययन निष्पत्ती यांचा विचार केला आहे. शिक्षकांनी अध्यापन सुरू करण्यापूर्वी त्यांचा अभ्यास करावा. वर्गात जाण्यापूर्वी शिक्षकांनी प्रत्येक पाठासाठी पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. (उदा., वाचनसाहित्य, शैक्षणिक साधने इत्यादी.)

**✻ माझे पान :**

पाठ्यपुस्तकातील पहिले पान हे मुलांसाठी आहे. त्यावर मुलांनी स्वत:चे चित्र काढणे अपेक्षित आहे. मला हवे तसे चित्र काढता येणार, रंगवता येणार या कल्पनेनेच विद्यार्थ्यांना पुस्तक स्वत:चे वाटेल. त्यांचे स्वत्व जपले जाईल. शिक्षकांनी मुले मनमोकळी होतील अशी वातावरण निर्मिती वर्गात करणे अपेक्षित आहे. मुलांनी कोणते व कसे चित्र काढावे, याबाबत आग्रही असू नये. चित्र काढणे व रंगवणे यासाठी त्यांना योग्य संधी दिली जावी.

**✻ सारे सारे गाऊया :**

औपचारिक शिक्षण सुरू करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी शाळेत रमणे, समवयस्क मित्रांबरोबर मोकळेपणाने वावरण्याचा आनंद घेणे महत्त्वाचे आहे. अशा वातावरण निर्मितीसाठी गाण्याइतके उत्तम साधन कोणते असणार? पाठ्यपुस्तकात **'सारे सारे गाऊया'** या शीर्षकांतर्गत गीतांचा समावेश केला आहे. त्यासाठी 'पक्षी गातो आहे' हा आयकॉन सर्वत्र वापरण्यात आला आहे. लय, तालबद्ध असणारी, अर्थपूर्ण आणि साभिनय म्हणता येतील अशी एकूण ८ गाणी पाठ्यपुस्तकात समाविष्ट केली आहेत. ताल, लय, सूर यांत रममाण होत मित्र-मैत्रिणींबरोबर साभिनय गीते म्हणण्याचा आनंद मुलांनी घ्यावा. तसेच त्यातून कळत नकळत संस्कारही व्हावेत हे ओघाने आलेच. उदा., 'इथं काय रुजतं? मातीखाली निजतं' हे गाणं मुलांनी शिकल्यानंतर त्यांना शाळेत किंवा घरी कुंडीत बी लावण्यास सांगावे. 'बी'ला मातीत रुजण्यासाठी मधूनमधून पाणी घालण्यास सांगावे. त्याचे निरीक्षण करण्यास सांगावे. स्वत: लावलेल्या 'बी'ला अंकुर फुटल्यावर तो पाहताना जो आनंद मुलांना होईल तो आनंद व संस्कार महत्त्वाचा आहे.

**※ अक्षरओळख :**

पाठ्यपुस्तकात सुरुवातीला वाचनपूर्व व लेखनपूर्व तयारीसाठी कृती दिल्या आहेत. मुलांना ज्या शब्दांचा अधिक परिचय आहे अशा शब्दांमधील अक्षरे व काही स्वरचिन्हे यांचा एक अक्षरगट तयार केला आहे. असे एकूण ९ अक्षरगट तयार केले आहेत. नवव्या गटात अॅ, ऑ या स्वरांचा परिचय करून दिलेला आहे. तसेच जोडाक्षरांचाही परिचय स्वतंत्रपणे करून दिलेला आहे. चित्रांच्या माध्यमातून परिचित व अपरिचित शब्दांची ओळख करून देत देत त्या शब्दांमधून अक्षरओळख करून दिलेली आहे. ऐकू येणाऱ्या ध्वनीतून अक्षरओळख, अक्षरांकडून शब्दांकडे नेणे, अक्षरांचे दृढीकरण करणे व त्यानंतर त्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या अनेक शब्दांचा सराव करून घेणे आणि त्यामधून वाचन आणि लेखन, अशी अध्ययन प्रक्रिया अपेक्षित आहे. शब्द पाहणे, शब्द ऐकणे, शब्द बोलणे, शब्द वाचणे, शब्द लिहिणे, अर्थ समजणे, शब्दांचा वस्तूंशी, कल्पनांशी संबंध बांधणे यालाच एकत्रितरीत्या 'शब्दानुभव' असे म्हणता येईल. या पाठ्यपुस्तकातील समाविष्ट शब्द हे प्रातिनिधिक आहेत. शिक्षकांनी असे विविध शब्दानुभव मुलांना देणे अपेक्षित आहे. शब्दानुभवाचा सराव देताना शिक्षकांनी 'समजेपर्यंत सराव' हे सूत्र लक्षात ठेवायला हवे.

**※ वाचनपाठ :**

प्रारंभी दोन अक्षरगटानंतर एक याप्रमाणे तीन वाचनपाठ दिलेले आहेत. त्यानंतरच्या तीन अक्षरगटानंतर एक वाचनपाठ असे एकूण चार वाचनपाठ देण्यात आलेले आहेत. परिचित व सराव झालेल्या शब्दांच्या वापरामुळे अर्थपूर्ण वाचनासाठी मुलांना संपूर्ण लिपीचा परिचय होईपर्यंत थांबवण्याची गरज पडणार नाही. मुले या वाचनपाठांची ओळख स्वत:हून करून घेतील आणि वाचनपाठाच्या सरावानंतर ज्ञात शब्दांचा वापर करून वाचनपाठांची रचना ते स्वत:हून करू शकतील.

**※ सहभागी वाचन :**

मुलांनी शिक्षकांच्या मदतीने वाचावे यासाठी पाठ्यपुस्तकात चित्रे व त्या अनुषंगाने काही संवाद दिले आहेत. या चित्रवाचनातून शिक्षकांनी वर्गात संवाद घडवून आणावा. चित्रांवर व संवादांवर प्रश्न विचारून/चर्चा करून/गप्पा मारून मुलांना बोलते करावे. मुलांनी स्वत:ची समज व पूर्वानुभव यांवर आधारित चर्चेत सहभागी व्हावे, हे अपेक्षित आहे. सहभागी वाचन करताना शिक्षकांकडून योग्य वाचनगती, आवाजातील आरोह, अवरोह यांसह प्रकट वाचन होणे अपेक्षित आहे. सहभागी वाचनाचे संवादी वाचन होणे अपेक्षित आहे. यासाठी वर्गातील मुलांच्या कोणत्याही उत्तराला नाकारू नये. त्यांच्या पूर्वानुभवांवर आधारित विचारांना चालना द्यावी, चर्चा करू द्यावी, मुलांना बोलते करावे. मुलांना खूप प्रश्न पडणे, त्यांनी प्रश्न विचारणे, स्वत:च्या कल्पनेने, मित्रांच्या मदतीने त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणे असा संवाद सहभागी वाचनात घडणे महत्त्वाचे आहे. उदा., 'माझे मित्र'.

**※ प्रकट वाचन :**

प्रकट वाचनामध्ये मुलांनी शिक्षकांच्या मदतीने अपरिचित शब्द वाचणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. प्रकट वाचनात शब्दांच्या उच्चारातील आरोह-अवरोह, त्या शब्दांचा अर्थ व त्यातील भावनांचे प्रकटीकरण याला अधिक महत्त्व असते. अशा अर्थपूर्ण वाचनाचे संस्कार मुलांवर याच टप्प्यावर होणे अधिक महत्त्वाचे असते. सहभागी वाचनात मुलांनी एकत्रित वाचनाचा (गोष्ट/चित्र) आनंद घेणे महत्त्वाचे आहे, तर प्रकट वाचनात भाषा, भाषेमधील चिन्हे (जसे प्रश्नचिन्ह/पूर्णविराम) यांचा जाणीवपूर्वक वापर व आरोह-अवरोहासह अर्थपूर्ण वाचन करणे महत्त्वाचे आहे.

**※ शब्दखेळ :**

शब्दसंपत्ती व भाषिक आनंद यांसाठी शब्दांची गंमत, शब्दखेळ, शब्दकोडे, शब्दसाखळी, शब्दांत लपलेले शब्द शोध अशा वेगवेगळ्या कृतींचा समावेश पाठ्यपुस्तकात केला आहे. मुलांचे अनुभवविश्व हळूहळू विकसित होणे हा या मागील उद्‌देश आहे. हे खेळ खेळताना, सोडवून घेताना कोणताही साचेबद्धपणा येणार नाही याची शिक्षकांनी काळजी घेणे आवश्यक आहे.


**※ कार्यात्मक व्याकरण :**

मुलांना कळत नकळतपणे कार्यात्मक व्याकरण घटकांची ओळख करून देण्यात आली आहे. पाठ्यपुस्तकात पूर्णविराम व प्रश्नचिन्ह यांची ओळख, शब्द वाच व तो, ती, ते च्या गटात लिही या घटकांचा समावेश केला आहे. या सर्वच घटकांची ओळख पाठापुरती/कृतीपुरती लक्षात न घेता अध्यापनात सर्वत्रच त्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

प्रारंभिक भाषाविकासासाठीचे हे महत्त्वाचे टप्पे विचारात घेऊन शिक्षकांनी वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुनियोजितपणे पार पाडावी.

# माझे पान

तुझे चित्र काढ आणि रंगव.





सारे सारे गाऊया

# अग्गोबाईऽऽ ढग्गोबाईऽऽऽ

अग्गोबाईऽऽ ढग्गोबाईऽऽऽ लागली कळ
ढगाला उन्हाची केवढी झळ!
थोडी न थोडकी, लागली फार!
डोंगराच्या डोळ्याला पाण्याची धार!! ।।धृ।।

वारा वारा गरागरा सो सो सूम...
ढोल्या ढोल्या ढगात ढुम ढुम ढुम...
वीजबाई अशी काही तोऱ्यामध्ये खडी
आकाशाच्या पाठीवर चम चम छडी!! ।।१।।

खोल खोल जमिनीचे उघडुन दार
बुड बुड बेडकाची बडबड फार!
डुंबायला डबक्याचा करू या तलाव
साबु–बिबु नको.. थोडा चिखल लगाव!! ।।२।।

– संदीप खरे



5CCLSF



# बीज



इथं काय रुजतं ?
मातीखाली निजतं
पाण्याने भिजतं,
इथं आहे इवलं
सुरेखसं बीज !



एवढासा कोंब
हळूच येईल वर,
सूर्य म्हणेल त्याला
माझा हात धर.



अंगाई गाणं
वारा गाईल त्याला,
झुलता झुलता
पानं येतील त्याला.



इवल्याशा रोपाचं
झाड होईल छान,
फुला-फळांनी
बहरेल रान.

– सुशील पगारिया

# माझे खेळ

◉ चित्र बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग.









5CVDVQ

# माझे मित्र

◉ **चित्र बघ, ऐक. तुझ्या मित्रांविषयी माहिती सांग.**

**माझे खूप सारे मित्र आहेत.**







माझ्या काही मित्रांना शेपटी आहे आणि काही मित्रांना तर पायच नाहीत.


माझे काही मित्र पाण्यात राहतात.


# माझे कुटुंब

◉ चित्र बघ. ऐक. चित्रांविषयी गप्पा मार.



अगं आई, आता माझा अभ्यास पूर्ण झाला आहे. मी बाबांकडे बागेत जाते.


बाबा! बाबा! आपली बाग किती सुंदर आहे. किती सुंदर फुले फुलली आहेत. मी तुम्हांला पाणी घालायला मदत करू का?





दादा, मलाही तुमच्याबरोबर खेळायचं आहे.


आजी-आजोबा, तुम्ही इथे बसला आहात होय? चला, आता आपण घरी जाऊया.




5NZRAH

# वाचनपूर्व व लेखनपूर्व तयारी


- जोड्या जुळव.



- चित्र बघ.

- नाव सांग, नाव दाखव.


   

| | | | |
|---|---|---|---|
| कप | मासा | लाटणे | पालक |

- जोड्या जुळव.

 मासा

 लाटणे

 पालक

 कप

- शब्द पाहा, सारख्या शब्दांच्या जोड्या जुळव.


| | |
|---|---|
| कप | लाटणे |
| पालक | मासा |
| मासा | पालक |
| लाटणे | कप |


- मुंगळा गुळापर्यंत कसा जाईल ते दाखव.






 बघ, गिरव, काढ.







5P9MCA

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.




कप



कपाट



कढई



कणीस

◉ 'क' आवाज ऐक. 'क' अक्षर पाहा. 'क' अक्षराला ◯ कर.

काका

मका नाक

झोका **क** सकाळ

कपाळ कळी

काकडी




गिरव, लिही, म्हण.


क

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.


मांजर


माकड


मोर


मासा

◉ 'म' आवाज ऐक. 'म' अक्षर पाहा. 'म' अक्षराला ◯ कर.

मगर

कमला

मामा

म

सामान

मैना

काम

मीरा

सोमवार


गिरव, लिही, म्हण.

म ................................................................................

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.


आगगाडी


आवळा


आरसा


आंबा

◉ 'आ' आवाज ऐक. 'आ' अक्षर पाहा. 'आ' अक्षराला ◯ कर.

आपण

आम्ही आज

आठ **आ** आवाज

आनंद आजी

आई


गिरव, लिही, म्हण.



◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.



लसूण



लाडू



लिंबू



लेझीम

◉ 'ल' आवाज ऐक. 'ल' अक्षर पाहा. 'ल' अक्षराला ◯ कर.

ल

गाल

रुमाल

लांब

खोकला

पालक


वेल

बैल

लाकूड



गिरव, लिही, म्हण.



◉ बघ. ऐक. म्हण.

ा







म ा | म ा  म ा  मा

क ा | क ा  क ा  का

ल ा | ल ा  ल ा  ला

◉ शब्द वाच, लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| काम | मला | लाल | मामा |
| ................ | ................ | ................ | ................ |
| ................ | ................ | ................ | ................ |
| आला | काका | मका | |
| ................ | ................ | ................ | |
| ................ | ................ | ................ | |

5PIIDX

# पाऊस

- गोष्ट ऐक. त्याप्रमाणे चित्र काढ.

दिनू शाळेतून घरी निघाला होता. आकाशात काळे ढग जमा झाले होते. थोड्या वेळातच पावसाला सुरुवात झाली. आकाशातून पाण्याचे थेंब खाली येत होते. दिनूला त्याची गंमत वाटली.

दिनू थेंबाला म्हणाला, ‘‘ थेंबा थेंबा, जरा माझ्याशी बोल.’’ थेंब म्हणाला, ‘‘काय रे दिनू?’’ दिनू म्हणाला, ‘‘तू आकाशातून उंचावरून येतोस हे दिसले मला; पण तू आकाशात गेलास कसा ते काही कळले नाही मला!’’

थेंब म्हणाला, ‘‘अरे खूप ऊन पडले, की आम्ही खूप खूप तापतो, आमची वाफ होते, वाफ हलकी हलकी असते. ती वर वर आकाशात जाते. मग वाफेचे ढग तयार होतात. ढगाला गारगार वारा लागतो, मग आम्ही खाली येतो, तुम्हांला पाणी द्यायला. नदी, नाले, तळी भरायला.’’




5PSEFK

# झोपाळा गेला उडून


- बघ. ऐक. म्हण.

एका तळ्यात दोन बेडूक होते. एकदा त्यांना पाण्यात दोन खांब दिसले. त्यांनी एक वेल आणून खांबांना बांधली.





वेलीचा छानदार झोपाळा तयार झाला ! दोघेही बेडूक त्यावर बसून झोके घेऊ लागले.



तोच काय गंमत झाली, अचानक तो झोपाळा उडू लागला.




ते दोन खांब नसून एका बगळ्याचे पाय आहेत, हे लक्षात आल्यावर बेडकांनी पटापट पाण्यात उड्या घेतल्या.

5Q2AH8

# माझी शाळा


- चित्र बघ, चित्रात काय–काय दिसते ते सांग.






# गमती शोध


- चित्र बघ, त्यातल्या गमती शोध, सांग.



# इ घ र ई ि ब ी

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.

इ




घ

◉ ‘इ’, ‘घ’ हे आवाज ऐक. ‘इ’ अक्षराला ◯ कर. ‘घ’ अक्षराला ☐ कर.

इडली मेघना इरा

घार घेवडा

इथे घमघम इकडे




गिरव, लिही, म्हण.

इ

घ

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.

र




ई

◉ 'र', 'ई' हे आवाज ऐक. 'र' अक्षराला ◯ कर. 'ई' अक्षराला ☐ कर.

रजई ताई गाजर

चटई सनई

वरण जाई गारवा

गिरव, लिही, म्हण.

र ..........................................................

ई ..........................................................

◉ बघ, ऐक, वाच.

ि

| ि | र | ि र ि र रि |
|---|---|---|


◉ 'ि' जोडून लिही.

जसे

| क | कि |
|---|---|
| म | |
| ल | |
| घ | |
| र | |

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.

ब




◉ 'ब' आवाज ऐक. 'ब' अक्षराला ◯ कर.

बाबा सरबत बोट कडुनिंब



गिरव, लिही, म्हण.

ब

◉ शब्द वाच, लिही.

| किरकिर | किलबिल | रिमा |
|---|---|---|

◉ बघ, ऐक, वाच.

ी

म | ी | म ी  म ी  मी


◉ ‘ ी ’ जोडून लिही.

जसे – क | की   म |    ल |    घ |    र |    ब |

◉ शब्द वाच, लिही.

मामी   काकी   लीला   घरी   आली

◉ वाच, लिही.




| | ा | ि | ी |
|---|---|---|---|
| क | का | कि | की |
| म | मा | मि | मी |
| ल | ला | ....... ....... | ....... ....... |
| घ | ....... ....... | घि | ....... ....... |
| र | ....... ....... | ....... ....... | ....... ....... |
| ब | ....... ....... | ....... ....... | ....... ....... |

5QB6IV

◉ **शब्द वाच, लिही.**

| | | |
|---|---|---|
| बिरबल | रिकामा | रिमा |
| ................ | ................ | ................ |
| ................ | ................ | ................ |
| मी | बी | मीरा |
| ................ | ................ | ................ |
| ................ | ................ | ................ |



## वाचनपाठ १

◉ **वाच.**

काका घरी आला.
काकी घरी आली.

मामा घरी आला.
मामी घरी आली.

काका घर बघ.
मामा घर बघ.

काकी इरा आली का?
आली आली आली.

मामी रिमा आली का?
आली आली आली.



5QK2KI



# आई, मला दे ना !



आई, मला छोटीशी बंदूक दे ना !
बंदूक घेईन । शिपाई होईन ।
ऐटीत चालीन । एक दोन तीन ।।१।।



आई, मला छोटीशी मोटार दे ना !
मोटार घेईन । ड्रायव्हर होईन ।
गावाला जाईन । पों पों पों ।।२।।

आई, मला छोटेसे विमान दे ना !
विमान घेईन । पायलट होईन ।
आकाशी जाईन । भर भर भर ।।३।।





आई, मला छोटीशी बाहुली दे ना !
बाहुली घेईन । तिजला मी सजवेन
ती संगे नाचेन । छुम छुम छुम ।।४।।


5QTXM6

उ न ु स प ऊ त ू

◉ **चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.**

उंदीर 

उखळ 

उंट 

# उ
# न

 नळ

 नोट

 नाक

◉ **बघ, ऐक, वाच.**

ु

| क |
|---|
| ु |

कु कु कु

◉ **'ु' जोडून लिही.**

जसे – क | कु   म |   ल |   घ |   र |

ब |   न |



**गिरव, लिही, म्हण.**

उ

न

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.






गिरव, लिही, म्हण.


स

प

ऊ

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.

# त




गिरव, लिही, म्हण.

त ..........................................................

◉ बघ, ऐक, वाच.

ू

| प |
|---|
| ू |

प ू    प ू    पू


गिरव, लिही, म्हण.

| पाहा | गिरव | लिही. |
|---|---|---|
| नु सु पु तु | नु सु पु तु | |
| नू सू पू तू | नू सू पू तू | |

5R3TNT

# माझे शब्द माझे मित्र

- गिरव. चित्र बघ, शब्द वाच.




म स




द द



वमान



चमण




रव



कण स



बाहल



झरळ



लिंब



लसण

- लिहूया, वाचूया.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू |
| म | मा | मि | मी | मु | मू |
| ल | ला | लि | ली | लु | लू |
| घ | घा | ....... ....... | घी | ....... ....... | घू |
| र | ....... ....... | ....... ....... | ....... ....... | रु | रू |
| ब | बा | ....... ....... | ....... ....... | ....... ....... | बू |
| न | ....... ....... | नि | ....... ....... | ....... ....... | ....... ....... |
| स | ....... ....... | ....... ....... | सी | ....... ....... | सू |
| प | ....... ....... | ....... ....... | ....... ....... | पु | ....... ....... |
| त | ....... ....... | ....... ....... | ती | ....... ....... | तू |

- शब्द वाच, लिही.

सुई पुरी सूर सूप

................ ................ ................ ................

................ ................ ................ ................


- शब्द शोधूया, लिहूया.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आ | ई | प | प | ई |
| घ | र | म | ऊ | र |
| म | का | न | स | सा |
| इ | मा | र | त | पा |
| बा | क | मा | ला | ल |

........................ ........................ ........................ ........................
........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................
........................ ........................ ........................ ........................


- चित्र बघ. कुत्रा व मांजर काय बोलत असतील ते सांग.



5RCPQG

# मांजराची गंमत

- चित्र बघ. गोष्ट सांग.



## ए च ळ ह झ े

◉ **चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.**

# ए

१

एक



एडका




एरंड


# च



चमचा



चाक



चरखा

# ळ



बाळ



माळ



विळी


# ह



हरिण



होडी



हत्ती


# झ



झाड



झाडू



झुरळ

◉ बघ, ऐक, वाच.

े

| े |
|---|
| प |

पे पे पे

◉ ‘ े ’ जोडून लिही, वाच.

जसे – क | के

| म | ल | घ | र | ब | न | स | प | त | ए | च | ळ | ह | झ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|



गिरव, लिही, म्हण.

ए ए ए ए ए ए

च च

ळ ळ

ह ह

झ झ

5RLKS4

- लिहूया, वाचूया.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे |
| ल | ला | लि | ली | लु | लू | .......<br>....... |
| घ | घा | घि | घी | .......<br>....... | घू | .......<br>....... |
| र | .......<br>....... | रि | .......<br>....... | रु | रू | .......<br>....... |
| ब | .......<br>....... | .......<br>....... | बी | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| न | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| स | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| प | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| त | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| च | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| ळ | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| ह | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |
| झ | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... | .......<br>....... |

# बाजार

- चित्र बघ. चित्रात काय काय दिसते ते सांग.







5RVGTR

- सांग पाहू. काय काय असेल बरे यांच्या आत?




- चित्र बघ, चव सांग.

 ⟷ गोड

 ⟷ आंबट



⟷ खारट

 ⟷ कडू

5S5CVE

# पूर्णविरामाची ओळख

- प्रत्येक गटातील एक शब्द घे. अर्थपूर्ण वाक्ये तयार कर. वाक्य झाल्यावर शेवटी पूर्णविराम नक्की दे.

| | | | |
|---|---|---|---|
| कमल | पाऊस | बघ | . |
| रमा | इमारत | घे | |
| उमा | सरबत | पी | |
| सलीम | कप | बस | |
| समीर | लवकर | कर | |
| नाना | | चल | |
| | | उचल | |

(१) कमल पाऊस बघ.

(२) ........................................

(३) ........................................

(४) ........................................

(५) ........................................

(६) ........................................

## शब्दखेळ

- शेवटी 'ळी' येणारे शब्द लिही.

जसे – कळी

.............................. ..............................

.............................. ..............................

.............................. ..............................

.............................. ..............................

.............................. ..............................

.............................. ..............................

64ILBY



# वाचनपाठ २

- गोलातील शब्द घे. अर्थपूर्ण वाक्य तयार कर. लिही व वाच.

चेतन ताई सूप काम घरी चहा लता घर पाऊस कमल सरबत

आले पी घे कर पाहा आली बघ आला उचल चल

ताई घरी आली.

- ‘ े ’ उच्चाराचे शब्द लिही.

जसे – तेल




गिरव, लिही, म्हण.

द ............................................................

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव लिही.

द





२

.............. .............. ..............

.............. .............. ..............



गिरव, लिही, म्हण.

ड ............................................................

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव लिही.

ड







.............. .............. ..............

.............. .............. ..............



## गिरव, लिही, म्हण.


व

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव लिही.

व









## गिरव, लिही, म्हण.

ग

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव लिही.

ग







◉ शब्द वाच, लिही.

रिपरिप सळसळ हळूहळू चुळबुळ




गिरव, लिही, म्हण.

ऐ

◉ चित्र बघ, नाव सांग. 'ऐ' अक्षराला ◯ कर.

ऐ



ऐरण



ऐक

◉ बघ, ऐक, वाच.

ै

| ै |
|---|
| ब |

बै बै बै

◉ ' ै ' जोडून लिही.

जसे – क | कै

म ल घ र ब न स प त

च ळ ह झ द ड व ग

◉ शब्द वाच, लिही.

कैरी बैल पैसे

64SHDL

ध य फ ओ ज श ो

◉ चित्र बघ. नाव सांग. अक्षर चित्र जोडी जुळव.



ध





य





फ








गिरव, लिही, म्हण.

ध

य

फ

◉ चित्र बघ. नाव सांग. अक्षर चित्र जोडी जुळव.



ओ

ज

श



गिरव, लिही, म्हण.

ओ ओ

ज ज

श श

◉ बघ, ऐक, वाच.

ो

| घ | ो | घ ो  घो  घो |
|---|---|---|

◉ ‘ ो ’ जोडून लिही.

जसे – | क | को |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | ल | घ | र | ब | न | स | प | त | च | ळ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | झ | द | ड | व | ग | ध | य | फ | ज | श |





## वाचनपाठ ३

◉ शिक्षकांच्या मदतीने चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून वाक्य तयार कर व वाच.

(१) गावाजवळ  होता.

(२)  त मासे होते.

(३)  फार चपळ होते.

(४) राजूला  पकडायचे होते.


(५) पकडता पकडता तोलच गेला.  बरोबर ओला झाला.

(६) मग दोघांनाही हसू आले.

652DF9



# माझा घोडा



टपटप टपटप टाकित टापा चाले माझा घोडा
पाठीवरती जीन मखमली पायि रुपेरी तोडा.

उंच उभारी दोन्ही कान
ऐटित वळवी अपुली मान
मधेच केव्हा दुडकत दुडकत चाले थोडा थोडा.

घोडा माझा फार हुशार
पाठीवर मी होता स्वार
नुसता त्याला पुरे इशारा, कशास चाबुक ओढा?

घोडा माझा घाली रिंगण
उखडुन टाकी सारे अंगण
काही त्याला अडवित नाही, नदी असो की ओढा.

सात अरण्ये, समुद्र सात
ओलांडित हा एक दमात
आला आला माझा घोडा, आधी रस्ता सोडा.

– शांता शेळके

65B9GH

# शब्दखेळ

- शब्द वाच. तो, ती, ते च्या गटात लिही.

पान उशी झाड ऊस समई चाक घर नळ फळा पपई मगर ससा

| तो | ती | ते |
|---|---|---|
| फळा | उशी | पान |
| .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. |
| .................. | .................. | .................. |

- चित्र बघ. चित्रांच्या आधारे पुढील शब्दसाखळी पूर्ण कर.

पान → नाग → गवत → तीन → ..................
..................

.................. .................. .................. .................. ..................
.................. .................. .................. .................. ..................



# प्रश्नचिन्हाची ओळख

- प्रत्येक गटातील एक शब्द घे. अर्थपूर्ण वाक्य तयार कर. वाक्य पूर्ण झाल्यावर शेवटी प्रश्नचिन्ह नक्की दे.

दीपा
रोहन
सीमा
चेतन
ओजस
पूजा

कधी
कुठे
काय
कसा

आली
आहे
आले
करते
करतो
राहतो
आला
राहते

?

(१) दीपा कधी आली ?
(२) ..................................
(३) ..................................
(४) ..................................
(५) ..................................
(६) ..................................



## असे कसे ?

असे कसे ? असे कसे ?
रात्रीचेच चांदणे दिसे !

असे कसे ? असे कसे ?
मोरालाच सुंदर पिसे !

असे कसे ? असे कसे ?
पाण्यातच झोपती मासे !

असे कसे ? असे कसे ?
आईसारखे कुणी नसे !

– राजा मंगळवेढेकर

- योग्य चिन्हे जोडून शब्द लिही, वाच.

| ि , ी |
|---|

व ही र    त ला    मा त    प र

| ु , ू |
|---|

क द ळ    क ब त र    झा ड    का प र

| े , ै |
|---|

ब डू क    र ड कू    ब ल    क री

| ो |
|---|

झ का    स म र    ग ग ल गा य    ज डी

## शब्दखेळ

- शब्दांत लपलेले शब्द शोध व लिही.

(१) बालभारती ................ ................ ................
................ ................ ................

(२) दुकानदार ................ ................ ................
................ ................ ................

(३) सकाळपासून ................ ................ ................
................ ................ ................

(४) अहमदनगर ................ ................ ................
................ ................ ................

(५) कोपरगाव ................ ................ ................
................ ................ ................

- लिहूया, वाचूया.

| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | ....... | ....... | ....... | ....... | ....... | मे | ....... | ....... |
| ल | ....... | ....... | ली | ....... | ....... | ....... | ....... | लो |
| घ | ....... | ....... | ....... | ....... | ....... | घे | ....... | ....... |
| र | ....... | ....... | ....... | ....... | रू | ....... | ....... | ....... |
| ब | ....... | ....... | बी | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| न | ....... | नि | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| स | ....... | ....... | ....... | ....... | सू | ....... | ....... | ....... |
| प | ....... | ....... | ....... | ....... | ....... | पे | ....... | ....... |
| त | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | तै | ....... |
| च | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | चो |
| ळ | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ळै | ....... |
| ह | ....... | ....... | ....... | ....... | ....... | हे | ....... | ....... |
| झ | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| द | ....... | ....... | ....... | दु | ....... | ....... | ....... | ....... |
| ड | ....... | ....... | ....... | ....... | डू | ....... | ....... | ....... |
| व | ....... | ....... | ....... | ....... | ....... | वे | ....... | ....... |
| ग | ....... | गि | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| ध | ....... | ....... | धी | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| य | ....... | ....... | ....... | यु | ....... | ....... | ....... | ....... |
| फ | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| ज | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... |
| श | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... | ....... |



# लोठेबाबा



लोठेबाबा लोठेबाबा,
झोपता किती ?
आठ तास दिवसा
आठ तास रात्री.

लोठेबाबा लोठेबाबा,
खाता काय तरी ?
पाच लीटर दुधासंगे
दहा किलो पुरी.





लोठेबाबा लोठेबाबा,
काय करता काम ?
काम शब्द ऐकताच
येतो मला घाम.

65K5IJ



# गाडी आली गाडी आली

गाडी आली गाडी आली चला पळा रे
गाडी थांबली गाडी थांबली धक्का मारा रे ।।धृ.।।



गाडी आली कोकणातून, आंबे आणले भरून भरून
आंबे उतरून घ्यारे आणि धक्का मारा रे ।।१।।



गाडी आली वसईहून, केळी आणली भरून भरून
केळी उतरून घ्यारे आणि धक्का मारा रे ।।२।।



गाडी आली नागपूरहून, संत्री आणली भरून भरून
संत्री उतरून घ्यारे आणि धक्का मारा रे ।।३।।




गाडी आली काश्मीरहून, सफरचंद आणली भरून भरून
सफरचंद उतरून घ्यारे आणि धक्का मारा रे ।।४।।




65U1K7

# जत्रा

- चित्र बघ. चित्रात काय काय दिसते ते सांग.






663HLU

## ण ख थ औ भ ौ

◉ चित्र बघ. नाव सांग. अक्षर चित्र जोडी जुळव.



ण

ख

थ



गिरव, लिही, म्हण.


ण ण

ख ख

थ थ

◉ चित्र बघ, नाव सांग. अक्षर चित्र जोडी जुळव.

# औ



# भ

गिरव, लिही, म्हण.

औ ........ औ ........

भ ........ भ ........

◉ बघ, ऐक, वाच.

# ौ

| ह | ौ |
|---|---|

ह ौ  ह ौ  हौ

66CSNH

◉ ‘ ौ ’ जोडून लिही, म्हण.

जसे – क | कौ


| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | ल | घ | र | ब | न | स | प | त | च | ळ | ह | झ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| द | ड | व | ग | ध | य | फ | ज | श | ण | ख | थ | भ |

## ट ढ ठ छ ष




गिरव, लिही, म्हण.




◉ चित्र बघ, नाव लिही, वाच.

ट








◉ 'ट' चे शब्द लिही, वाच.

टाळी



गिरव, लिही, म्हण.




◉ चित्र बघ, नाव सांग, नाव लिही, वाच.

ढ







◉ 'ढ' चे शब्द लिही, वाच.

पेढा

◉ चित्र बघ, नाव सांग.



गिरव, लिही, म्हण.

# ठ





◉ 'ठ' चे शब्द लिही, वाच.

ठिणगी

◉ चित्र बघ, नाव सांग.



गिरव, लिही, म्हण.

# छ





◉ 'छ' चे शब्द लिही, वाच.


बछडा


◉ चित्र बघ, नाव सांग.



गिरव, लिही, म्हण.

# ष





◉ 'ष' चे शब्द लिही, वाच.

विशेष

- चित्र बघ. वाक्य लिही, वाच.



...............................................................
...............................................................



...............................................................
...............................................................



...............................................................
...............................................................



...............................................................
...............................................................



...............................................................
...............................................................



...............................................................
...............................................................

66LNQ5




# वेडं कोकरू

वेडं कोकरू खूप थकलं
येताना घरी वाट चुकलं

अंधार बघून भलतच भ्यालं
दमून दमून झोपेला आलं





शेवटी एकदा घर दिसलं
वेडं कोकरू गोड हसलं

डोकं ठेवून गवताच्या उशीत
हळूच शिरलं आईच्या कुशीत

– मंगेश पाडगावकर

66VJRS

## क्ष ज्ञ अ अॅ ऑ अं अः



**गिरव, लिही, वाच.**

क्ष

क्षण क्षमा क्षितिज पक्षी बक्षीस

ज्ञ

यज्ञ ज्ञान आज्ञा विज्ञान ज्ञानदेव

अ

अभय अकरा अळी अजून अगोदर

अॅ

बॅट सॅक हॅट कॅमेरा बॅटरी

ऑ

कॉट बॉल गॉगल सॉस मॉल

अं

अंगण अंगठी अंक अंजीर अंगरखा

अः

स्वतः दुःख शतशः उषःकाल अंशतः

◉ शब्दातील पहिल्या अक्षरावर अनुस्वार दे. शब्द पुन्हा लिही, वाच.

जसे – (१) सोड सोंड.................... (२) नदी ....................

(३) माडी .................... (४) आबा ....................

(५) थडी .................... (६) साग ....................

(७) कुडी .................... (८) वदन ....................

● कंसातील योग्य स्वरचिन्हांचा वापर करून शब्द तयार कर.

( ा ि ी ु ू े ै ो ौ ं )

| | | |
|---|---|---|
| बा ह ली | सा म स म | स म वा र |
| म दा न | प ठ णी | भ गो ल |
| पा ल ख | ए ट दा र | स नि क |
| ट क ली | प च का री | अ ळ ख |
| ह द | द प र | स ध्या का ळ |

675FTF

## • घटनाक्रम लाव.

| | | |
|---|---|---|
| पाने आली, फुले आली. | (१) | ........................................ |
| कोंब फुटले. | (२) | ........................................ |
| झाडाला फळे आली. | (३) | ........................................ |
| पाणी घातले. | (४) | ........................................ |
| बी रुजवले. | (५) | ........................................ |
| रोप वाढले. | (६) | ........................................ |

## ◉ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भर.

(घे, दे, ये, जा, घे, आण)

(१) इरा हे पैसे ........................ .

(२) बाजारात ........................ .

(३) बाजारातून भेंडी, टोमॅटो ........................ .

(४) पैसे मोजून ........................ .

(५) उरलेले पैसे परत ........................ .


(६) घरी लवकर परत ........................ .

# जोडाक्षरे

* बघ, ऐक, वाच.

| | | |
|---|---|---|
| त्‌ या | च्‌ या | स्‌ त |
| त्‌ या | च्‌ या | स्‌ त |
| त्या | च्या | स्त |
| होत्या | मिरच्या | मस्तक |
| आत्या | गावाच्या | पुस्तक |
| पणत्या | नावाच्या | जास्त |

* गोलातील अक्षराला गोलाबाहेरील अक्षर जोडून शब्द तयार कर.




सल्ला

67EBV3



# वाचनपाठ ४

● वाच.

(१) आकाश निळे दिसत होते.

(२) जोराचा वारा सुटला होता.

(३) मुलांनी पतंग उडवायचे ठरवले.

(४) कैवल्यने पतंगाचे सामान आणले.

(५) अक्षताने पतंग बनवले.

(६) सगळे पतंग उडवण्यासाठी मैदानावर आले.

(७) ॲना पतंग उडवत होती.


(८) ज्ञानेशने मांजा धरला होता.

(९) आकाशात रंगीबेरंगी पतंग दिसत होते.

(१०) पतंग उडवून मुलांना मजा आली.



● चित्रे बघ. गोष्ट तयार कर. सांग.









# रेघ लहान झाली.

- **गोष्ट वाच.**

अकबर आणि बिरबल एकदा फिरायला गेले होते. चालता चालता बादशहा अचानक थांबला. बादशहाने वाळूत बोटाने एक रेघ मारली आणि बिरबलाला विचारले, ''ही रेघ पाहिलीस? ही रेघ लहान करायची; पण पुसायची नाही. जमेल तुला?''

बिरबलाने एकवेळ बादशहाकडे व एकवेळ रेघेकडे पाहिले. थोडा विचार केला. पटकन खाली वाकला. रेघेशेजारी दुसरी लांब रेघ मारली आणि म्हणाला, ''महाराज, झाली की नाही तुमची रेघ लहान?'' बादशहा चकित होऊन पाहतच राहिला!





- **हे करून बघ.**

(१) पाटीवर एक रेघ काढ. ती रेघ न पुसता लहान करून दाखव.


(२) पाटीवर एक रेघ काढ. त्या रेघेला हात न लावता ती मोठी करून दाखव.

(३) बिरबलाने रेघ लहान करण्याची युक्ती केली तशी दुसरी युक्ती तुला सुचते का? कोणती ते सांग.

6J2GDA



# जंगलात ठरली मैफल



जंगलात ठरली नाचगाण्याची मैफल
अस्वल म्हणालं, ही तर हत्तीची अक्कल.

तबल्यावर होती कोल्होबाची साथ
वाघोबा म्हणाले, नाही ना बात?

पेटी मी किती वाजवतो सुंदर
हसत हसत म्हणाले साळींदर.

गुंडू-पांडू लांडग्यांना तंबोऱ्याची हौस
संतूर वाजवू म्हणाले चिकीमिकी माऊस!

मुंगीने लावला वरचा सां
आवाज आवाज ओरडला ससा.

ठुमकत नाचत आला मोर
वन्समोअर, वन्समोअर झाला शोर!

– पूर्वी भावे

# माझा भारत

**भारत माझा देश आहे**
**मी भारतीय आहे.**



हा भारताचा राष्ट्रध्वज.
राष्ट्रध्वज तिरंगी आहे.

हा भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर.
मोर सुंदर आहे.





हा भारताचा राष्ट्रीय पशू वाघ.
वाघ ऐटदार आहे.

हा भारताचा पर्वत हिमालय.
हिमालय उंच आहे.





भारताची राजधानी दिल्ली.
दिल्ली मोठे शहर आहे.

6JK8GK

**जय जय भारत! माझा भारत.**

**✻ लिहूया, वाचूया.**

| | ा | ि | ी | ु | ू | े | ॅ | ै | ो | ॉ | ौ | ं | ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | | | | | | | | | | | | | |
| ग | | | | | | | | | | | | | |
| घ | | | | | | | | | | | | | |
| च | | | | | | | | | | | | | |
| छ | | | | | | | | | | | | | |
| ज | | | | | | | | | | | | | |
| झ | | | | | | | | | | | | | |
| ट | | | | | | | | | | | | | |
| ठ | | | | | | | | | | | | | |
| ड | | | | | | | | | | | | | |
| ढ | | | | | | | | | | | | | |
| ण | | | | | | | | | | | | | |
| त | | | | | | | | | | | | | |
| थ | | | | | | | | | | | | | |
| द | | | | | | | | | | | | | |
| ध | | | | | | | | | | | | | |


| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | | | | | | | | | | | | | |
| प | | | | | | | | | | | | | |
| फ | | | | | | | | | | | | | |
| ब | | | | | | | | | | | | | |
| भ | | | | | | | | | | | | | |
| म | | | | | | | | | | | | | |
| य | | | | | | | | | | | | | |
| र | | | | | | | | | | | | | |
| ल | | | | | | | | | | | | | |
| व | | | | | | | | | | | | | |
| श | | | | | | | | | | | | | |
| ष | | | | | | | | | | | | | |
| स | | | | | | | | | | | | | |
| ह | | | | | | | | | | | | | |
| ळ | | | | | | | | | | | | | |
| क्ष | | | | | | | | | | | | | |
| ज्ञ | | | | | | | | | | | | | |


• अक्षरे व चिन्हे जोड. शब्द तयार कर.












# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता पहिली (मराठी)

₹ ४२.००